दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७८ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.३० मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## प्रकाश आंबेडकर यांचा मेगाप्लॅन

# २ एप्रिल रोजी भाजपच्या विरोधात नवी आघाडी करणार

मुंबई (वृत्तसंस्था)–येणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भाजपला मात देण्यासाठी मेगाप्लॅन तयार केला आहे. २ एप्रिल रोजी आम्ही सर्व काही स्पष्ट करणार आहोत. भाजप विरोधी सर्व संघटनांना एकत्र करून भाजपविरोधात नवीन आघाडी तयार करण्यात येणार असल्याचे मोठे विधान प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. तसेच महाविकास आघाडीमध्येच शिवसेना आणि काँग्रेस यांचे सूत जमलेले नाही असेही ते म्हणाले. आज पत्रकार परिषद घेऊन प्रकाश आंबेडकर यांनी अनेक मुद्द्यांवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे.



यावेळी बोलतांना आंबेडकर यांनी भाजपच्या विरोधात वेगळी आघाडी निर्माण करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. ते म्हणाले, ''मनोज जरांगेंशी लोकसभेसंदर्भात चर्चा झाली आहे. लोकसभेसंदर्भातच त्यांची भेट घेतली होती. त्यांचा लोकसभेबाबत डेटा आज येईल आणि पुढची वाटचाल देखील येईल. यंदाच्या लोकसभेत २ एप्रिलपर्यंत भाजपविरोधातली आघाडी उभी राहिलेली दिसेल. ज्या संघटनांशी आम्ही बोलतोय त्या संघटनांचा अजेंडा देखील समोर येत आहे. येत्या २ तारखेला त्या संघटना कोणत्या हे देखील कळेल'', असे आंबेडकर यांनी स्पष्टपणे सांगितले.दरम्यान, यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीबाबत देखील मोठी विधाने केली आहेत. ''भाजपाविरोधात मजबूत आघाडी उभी करण्याचा आमचा प्रयत्न होता. मात्र दुर्दैवाने आम्हाला हवी त्यापद्धतीने आघाडी उभी राहत नव्हती. आम्हाला वेगळं पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याचं लक्षात आले. जोपर्यंत सुभाष देसाई यांच्याशी चर्चा होत होती, तोपर्यंत सर्व काही सकारात्मक होते. चर्चा पुढे जात होती. पण नंतर कुणी तरी कुणासाठी आम्हाला वापरून घेत असल्याचे दिसले'', असे आंबेडकर म्हणाले.तसेच आमचे दरवाजे आजही बंद झालेले नाहीत. सर्वांसाठी दरवाजे खुले आहेत असे सूचक विधानही आंबेडकर यांनी केली आहे. याशिवाय त्यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील जहरी टीका केली आहे. ''संजय राऊत महाविकास आघाडीबाबत चुकीची माहिती देत आहेत. संजय राऊत महाविकास आघाडीत बिघाडी करत आहेत. मला महाविकास आघाडीकडून माझा मतदारसंघ आणि इतर दुसऱ्या मतदारसंघाचा प्रस्ताव आला होता'', असे आंबेडकर म्हणाले.तसेच निवडणुकीचा पहिला टप्पा येत आहे. महाविकास आघाडीमध्ये वाद आहेत. मी आधीपासूनच त्यांचे जमत नाही असे सांगत होतो. त्याकडे तुम्ही लक्ष दिले नाही. त्यांनी आपले कोंबडं झाकले आहे. ते दाखवायला तयार नाहीत. शिवसेना आणि काँग्रेस यांचे सूत जमलेले नाही. ते आता उघड व्हायला लागले आहे. मला भांडणं लावायचे नाही'', असा दावाही आंबेडकर यांनी केला.

## पोलिसांचा खबरी असल्याचा संशय
# गडचिरोलीत माओवाद्यांकडून एकाची हत्या
### राष्ट्रीय महामार्गावर टाकला मृतदेह

**गडचिरोली । प्रतिनिधी**

पोलिसांचा खबरी असल्याचे सांगत माओवाद्यांनी एका आदिवासी इसमाची हत्या केल्याची घटना २९ मार्च ला पहाटेच्या सुमारास उघडकीस आली आहे.अशोक तलांडी (रा.दामरंचा,ता.अहेरी) असे हत्या झालेल्या इसमाचे नाव असून या घटनेने परिसरात दहशत निर्माण झाली आहे.

आलापल्ली ते भामरागड या राष्ट्रीय महामार्गावरील ताडगाव वरून जवळपास पाच ते सहा किलोमीटर अंतरावर अशोक तलांडी यांचा मृतदेह आढळून आला आहे. विशेष म्हणजे मृतदेहाजवळ काही पत्रके आढळून आले असून त्यात अशोक हा पोलिसांचा खबरी असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.अशोक तलांडे याला अनेकदा सुधारण्याची संधी दिली होती.त्याच्या घरच्यांना आणि नातेवाईकांना सुद्धा सुधारण्यास सांगण्यात आले.मात्र तो सुधरला नाही.त्यामुळे जनता अदालत मध्ये त्याला सजा देण्यात आली असून याला जिम्मेदार एक ठाणेदार असल्याचा उल्लेख देखील त्या पत्रकात करण्यात आला आहे.



**घटनास्थळी आढळले पत्रक**

माओवादी कोऱ्या कागदावर लाल रंगाने लिहिलेले पत्रक वापरतात. मात्र, घटनास्थळावर आढळलेले पत्रक हे वहीच्या पानावर लिहिलेले होते.बाल पेनी ने लिहिले पत्रकात खाली पेरमिली एरिया कमिटी भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) मार्च २०२४ असा उल्लेख आहे.

अशोक तलांडे हा मूळचा दामरंचा येथील रहिवासी असला तरी तो मागील काही दिवसांपासून आपल्या पत्नी सोबत भामरागड तालुक्यातील ताडगाव परिसरात राहत होता.अशोक हा अत्यंत गरीब असून मोलमजुरी करून उदरनिर्वाह करायचा. त्याच्या पश्चात पत्नी आणि मुलगा असल्याची माहिती आहे.नेमकं सदर व्यक्ती केंव्हापासून घरून गायब आहे याची माहिती कळू शकली नाही.मात्र,अशोक तलांडे हा पोलिस खबरी नसल्याचे पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी सांगितले आहे.या घटनेचा तपास ताडगाव पोलीस करीत असून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दहशत निर्माण झाली आहे.

# तळोधी परिसरात चोरीच्या घटनेत वाढ
# पोलीस कर्मचारी वाढविण्याची मागणी
### जनतेनी सजग राहण्याचे ठाणेदाराचे आवाहन

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील पोलिस स्टेशन तळोधी बा. अतंर्गत येतं असलेल्या ४२ गावामध्ये पोलिसांना कर्तव्य बजवातांना दमछाक होत असुन अपुऱ्या कर्मचाऱ्यामूळे परिसरात चोऱ्या, अवैध वाळू, अवैध दारू, सट्टामटका, आदी घटनांनी डोके वर काढले असुन ४२ गावांसाठी दोन पीएसआय, व इतर विस कर्मचारी कार्यरत असल्याने परिसरात अवैध धंद्यावर अंकूश तथा शांतता सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीने ताण पडत आहे.

तळोधी परिसरात चोरीचे प्रमाण वाढले आहे. मौल्यवान वस्तू व रोकड असलेल्या खोलीत झोपावे दरवाजे भक्कम लावावे. शक्यतोवर बाहेरगावी मुक्काम टाळावे. गावांतील तरून मुलांनी गावांत गस्त घालून संशयित इसम आढळल्यास पोलिसांना कळवून सहकार्य करावे.

**अजितसिंग देवरे**
**सा.पो.नि. तळोधी (बा.)**



तळोधी पोलिस स्टेशन अंतर्गत आज पर्यंत सावरगाव, वलनी, आकापूर, तळोधी, ओवाळा, आदी गावांमध्ये अनेकांचे घरी चोऱ्या झाल्या आहेत. तर शेतशिवारातून विजपंप व शेती उपयोगी साहित्य चोरट्यांनी लंपास केल्याच्या घटना घटल्याने परिसरात चोरट्या टोळीबाबत दहशत निर्माण झाली आहे. पोलिस स्टेशन मध्ये पुरेसे कर्मचारी नाही. सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यापैकी तिन ते चार कर्मचारी न्यायालयीन कामकाजात असतात.काही विभागीय कार्यालयात तर काही साप्ताहिक रजेवर असतात. त्यामुळे मोजक्याच कर्मचाऱ्यांच्या भरवश्यावर पोलिस स्टेशन चा कारभार सुरू असतो. सध्या लोकसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अशावेळी जादा कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. मात्र या पोलिस स्टेशन मध्ये ५२ कर्मचाऱ्यांचे पदे मंजूर असुन फक्त २२ पदेच भरण्यात आले आहेत. याचाच परिणाम म्हणून तळोधी पोलिस स्टेशन अंतर्गत परिसरात पोलिसांना तारेवरची कसरत करावी लागते. जिल्हा पोलिस अधीक्षकांनी यांची दखल घेवून येथे जास्तीचे कर्मचारी नियुक्त करावे असी मागणी नागरिकांनी केली आहे.

# बंगाली कॅम्प चौकात एटीएम फोडण्याचा प्रयत्न
### एटीएमची सुरक्षा रामभरोसे




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरातील वर्दळीचे ठिकाण असलेल्या बंगाली कॅम्प चौकातील बँक ऑफ इंडियाचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न केला. ही घटना गुरूवारी रात्रीच्या सुमारास घडली असून, शुक्रवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

अज्ञात चोरट्याचा हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला. अज्ञात चोरट्याचा शोध पोलिस घेत आहेत. बंगाली कॅम्प चौकात बँक ऑफ इंडियाचे एटीएम आहे. पण, इथे सुरक्षा रक्षक नाही. त्यामुळे सलग दुसऱ्यांदा हे एटीएम फोडण्याचा प्रयत्न अज्ञातांनी केला.पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता,पांढरा शर्ट आणि डोक्याला कपडा गुंडाळलेला व्यक्ती एटीएममध्ये घुसला. त्यानंतर त्याने एटीएम फोडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. याप्रकरणाचा तपास रामनगर पोलिस करीत आहेत. महानगरातील बहुतांश एटीएममध्ये सुरक्षा रक्षक नाहीत. एटीएमची सुरक्षा रामभरोसे आहे. सतत होत असलेल्या या घटनांमुळे रात्रीची गस्त वाढविण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# महिलेची गळफास घेवून आत्महत्या

**माजरी । प्रतिनिधी**

माजरी – वेकोलि वसाहत कुचना येथे गुरुवारी सायंकाळी धक्कादायक घटना समोर आली असून एका विवाहित महिलेने गळफास घेवून आत्महत्या केली. अन्नू राहुल शाहू (३२) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे चे नाव आहे.



प्राप्त माहितीनुसार गुरुवारी (दि.२८ मार्च) सायंकाळी माजरी येथील वेकोलिच्या एरिया हॉस्पिटल येथून आलेल्या मेमो वरून पोलिसांनी भेट दिली असता अन्नू राहुल शाहू रा.कुचना वसाहत क्का. नं. इ–११ हिने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले. मृतक महिलेचे पती राहुल रमेशसिंग शाहू,सहाय्यक प्रबंधक ( वित्त विभाग ) या पदावर वेकोलि येथे कार्यरत आहेत. दरम्यान अन्नू व राहुल हे दोघे पती पत्नी दिनांक २३ मार्च रोजी होळी निमित ते आपले मूळगावी गेले होते. २८ मार्च रोजी दुपारी दोन वाजता ते पती पत्नी मूळ गाव दिल्ली येथून परत आले. दरम्यान त्यांनी घरची साफसफाई करत असताना मृतक महिला ही फोनवर बोलत बसली होती. दरम्यान पती राहुल शाहू याने काम लवकर करून स्वयंपाक कर नंतर बोल घरच्यांशी अशे बोलून तीचा मोबाइल घेवून बंद केला. त्याच रागावरून अन्नू ही बेडरूम मध्ये निघून गेली व दरवाजा बंद करून घेतला. नेहमीचे राग असल्याने ती शांत होईल असे समजून पती पेपर वाचत बसला. दरम्यान बराच वेळ होऊनही ती बाहेर न निघाल्याने दार आतून बंद असल्याने व दार ठोठावूनही बोलत नसल्याने पती ने बाहेरून खिडकी तुन बघितले असता, ती पंख्याला गळफास लावलेली दिसली. दरम्यान राहुलने आजूबाजूच्या लोकांच्या मदतीने दार तोडून तिला स्वतःच्या कार ने एरिया हॉस्पिटल माजरी येथे नेले असता अन्नूला डॉक्टरनी मृत घोषित केले.अन्नू आणि राहुलच्या लग्नाला दोन वर्ष झाले असून त्यांना मुळ बाळ नाहीत. पती पत्नी हे दोघेच राहत होते. पोलिसांनी याप्रकारणी मर्ग दाखल करून मृतक महिलेचे प्रेत उत्तरीय तपासणीकरिता उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे पाठविले आहे.पुढील तपास माजरीचे ठाणेदार सारंग मिराशी यांच्या मार्गदर्शनात माजरी पोलिस करित आहे.

# उदयनराजेंना तिकीट देणार का ?:पत्रकारांचा प्रश्न ऐकताच शरद पवार यांनी उडवली कॉलर


**सातारा**–राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी पुढील २ दिवसांत सातारा लोकसभा मतदार संघाचा उमेदवार जाहीर करण्याची घोषणा केली. यावेळी पत्रकारांनी त्यांना महायुतीने उदयनराजेंना तिकीट दिले नाही तर तुम्ही देणार का? असा प्रश्न केला असता त्यांनी हसत आपली कॉलर उडवली. तसेच सातारकर फारच चाणाक्ष आहेत, असे सूचक उत्तर दिले.

भाजपचे राज्यसभा सदस्य उदयनराजे भोसले सातारा लोकसभेची निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. यासाठी त्यांनी दिल्लीत ३ दिवस तळ ठोकला. त्यानंतर त्यांची केंद्रीय



गृहमंत्री अमित शहा यांची भेट झाली. त्यानंतर त्यांचे साताऱ्यात जंगी स्वागत केले. पण भाजपने त्यांना अद्याप उमेदवारी घोषित केली नाही. या पार्श्वभूमीवर पत्रकारांनी गुरुवारी साताऱ्याच्या दौऱ्यावर असणाऱ्या शरद पवार यांना उदयनराजेंना उमेदवारीविषयी प्रश्न केला. महायुतीने उदयनराजे यांना अद्याप तिकीट दिले नाही. त्यामुळे त्यांनी तुमच्याशी संपर्क साधला तर त्यांच्याशी बोलणार का? असा प्रश्न पत्रकारांनी पवारांना केला. त्यावर पवारांनी तूर्त तरी तशी कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट केले.त्यावर पत्रकारांनी शरद पवारांना मग तुम्ही कॉलर उडवणार का? असा उलटप्रश्न केला. त्यावर पवारांनी पत्रकार परिषदेतच आपली कॉलर उडवून दाखवली. त्यामुळे पत्रकार परिषदेत एकच हशा पिकला. त्यानंतर पवार म्हणाले की, उदयनराजे आता भाजपत आहेत. २ दिवसांपूर्वीच सातारा शहराने त्यांचे संपूर्ण रस्त्यात स्वागत केल्याचे पाहिले. त्यामुळे त्यांनी आमच्याशी संपर्क साधण्याचा प्रश्नच येत नाही.

# माजी पंचायत समिती उपसभापतीला अवैध दारू विक्री प्रकरणी अटक
### अवैध दारू विक्री विरोधात ठाणेदार हत्तीगोटे यांचे धाडसत्र सुरूच...



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**


करंजी येथील गुरुदेव राईस मिलच्या मागील बाजूस अवैधरित्या दारूचा साठा ठेवून दारू विक्री केली जात असल्याची गुप्त माहिती गोंडपिपरी पोलिस स्टेशनचे ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांना मिळाली.लागलीच गोंडपिपरी पोलिसांनी राईस मिलची पाहणी केली असता राईस मिलच्या मागच्या बाजूला एका लाकडी आलमारीमध्ये अवैध दारुसाठा सापडला. त्याची एकूण किंमत १८,६२५ रूपये आहे.

सदर माल हा अवैध्यरित्या सापडल्याने गोंडपिपरी पोलिसांनी दि २८ गुरुवारी सायंकाडी ६ वाजता दरम्यान माजी पंचायत समिती उपसभापती तुकेश वानोडे यांच्यावर गुन्हा नोद केला.सदर कारवाई उपविभागिय पोलीस अधिकारी भगत यांच्या मार्गदर्शनात ठाणेदारं रमेश हत्तीगोटे,पो. हवा. सुरपाम,कोवे ,नासीर,पवार, अनिता, कोसणशिले,मडावी यांनी केली आहे.

# विश्व रंगभूमी व मराठी रंगभूमी !

**बाल रंगभूमीने नाट्य व सिनेमा सृष्टीला अनेक कलावंत दिले आहेत. मराठी रंगभूमीला सशक्त करण्यासाठी लहान वयापासूनच रंगभूमीची माहिती व आकर्षण निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी अशा बालनाट्य शिबिराची आवश्यकता असते. यातून कलावंत, तंत्रज्ञ आणि रसिक निर्माण होण्याचे कार्य घडत असते. खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीला सशक्त करण्याचे काम राज्यभरात होणाऱ्या अशा बालनाट्य स्पर्धा आणि शिबिरातून होत असते. हे डॉ.सतीश साळुंके, डॉ.दीपा क्षीरसागर आणि आसिफ अन्सारी यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते. मराठी रंगभूमीचा उद्धार केला पाहिजे, अशी तोंडाची वाफ आपण सतत दवडतो. परंतु रंगभूमीसाठी प्रत्यक्षात काय करतो? गेलेले सुवर्ण दिवस आठवण्याशिवाय रंगभूमीच्या उत्कर्षासाठी काही करतो का? हा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. अशी मनाची तगमग श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी– अलककार हे या लेखातून व्यक्त करत आहेत... संपादक.**

आद्य नाटककार अश्वघोष, तृतीय रत्नकार महात्मा जोतीरावजी फुले यांच्या लेखणीतून निर्माण झालेली भारतीय नाट्य परंपरा आजही बहरत आहे. विष्णूदास भावे यांच्या सीता स्वयंवर या नाटकाचा सन १८४३मध्ये सांगली येथे प्रयोग सादर करण्यात आला. त्यानंतर मराठी रंगभूमीने वेगवेगळी वळणे घेतली. त्यातील एक महत्त्वूर्ण वळण म्हणजे संगीत रंगभूमी होय. मराठी रंगभूमीवर सादर झालेली संगीत नाटके मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ होता. दरम्यान, अगोदर चित्रपट त्यानंतर खासगी दूरचित्रवाहिन्या आणि आता स्मार्ट भ्रमणध्वनी, इंटरनेट, संगणक यांच्या आक्रमणामुळे नाटक टिकणार का? अशीही शंका रसिकांच्या मनात येत आहे. सध्याची तरुणाई ही स्मार्टफोन, फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम यात गुरफटलेली आहे. परंतु या सर्व माध्यमांकडे शत्रू म्हणून न पाहता मित्र म्हणून पाहुया. त्याचा मराठी नाटकांची प्रसिद्धी आणि तरुणाईला मराठी नाटकांकडे वळविणे यांसाठी अधिकाधिक उपयोग करून घेण्याची गरज आहे. लोकांना जे आवडते ते देण्यातच आपली मराठी रंगभूमी मश्गूल राहिली. म्हणून आपले नाटक मागे पडले. कोणतेही प्रश्न तीव्रतेने मांडणारे नाटक तुम्ही घ्या, ते चालले नाही. कारण मुळात प्रेक्षकांची मनोभूमिकाच बदललेली नाही. काही मोजके कलाकार–लेखक तसा प्रयत्न करीत असले, तरी त्याचा उपयोग होत नाही, असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ नाटककार आणि लेखक प्रेमानंद गज्वी करतात.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.**

रंगभूमीच्या इतिहासापासून ते आजची रंगभूमी, मराठी नाटककारांनी लिहिलेली नाटके, त्यांच्या मर्यादा, प्रेक्षकांची मनोभूमिका या मुद्द्यांवर सविस्तर विवेचन करणे काळाजी गरज आहे. विष्णूदास भावे यांच्या काळातील नाटके, ज्येष्ठ नाटककार खाडीलकर, देवल, कोल्हटकर, गडकरी यांनी लिहिलेली नाटके यांचा परिचय आजच्या पिढीला करून दिले पाहिजे. मराठी रंगभूमीचा इतिहास सांगताना सन १८४३पूर्वी रंगभूमी होती आणि तेव्हापासून व्यावसायिक रंगभूमी कशी अस्तित्वात आली? हे लक्षात घेतले पाहिजे. पूर्वी तंजावरमध्ये नाटके लिहिली जायची, त्यांचे प्रयोग व्हायचे. शिक्षणसम्राट महात्मा जोतिबा फुले यांनी सन १८५५ साली नाटक लिहिले होते. परंतु त्या नाटकाचा प्रयोगच होऊ शकला नाही. कारण ब्रिटिशांनी त्यांना प्रयोग करण्याची परवानगी दिली नाही. मात्र त्यांनी नाटक लिहिलेय, हे आपल्याला कळले ते सन १९७८ साली. कारण त्याची नोंदच नव्हती. याचा अर्थ रंगभूमीवरील नोंदी घेणे आवश्यक आहे. मराठी रंगभूमी खऱ्या अर्थाने बदलली ती विजय तेंडुलकरांच्या काळापासून. पण, त्यांना जेवढा त्रास झाला तेवढा कोणत्याही नाटककाराला झाला नाही. याचे कारण म्हणजे त्यांचे वास्तववादी लेखन होय. आजपर्यंतच्या रंगभूमीचा आढावा घेतला असता; असे लक्षात येते, की इंग्रजी नाटके मराठीत अनुवादित होतात. मात्र, मराठी नाटक इंग्रजीत अनुवादित होत नाहीत. शेक्सपिअरची सर्वच्या सर्व नाटके आपल्याकडे अनुवादित झाली आहेत. परंतु मराठीतील एकाही नाटककाराचे नाटक इंग्रजीत गेलेले नाही. आपली नाटके लंडनमध्ये वगैरे सादर होतात. मात्र ती तिथल्या महाराष्ट्र मंडळांनी म्हणजे आपल्याच लोकांनी आपल्याला निमंत्रित केलेले असते. इंग्रजांनी कधी आपल्याकडील एखादे नाटक सादर करण्यासाठी तेथे निमंत्रित केले आहे का? त्या ताकदीची कलाकृती निर्माण व्हायला हवी, हे नाटककार प्रेमानंद गज्वी यांचे मत गांभीर्याने विचारात घ्यावे लागेल. बाल रंगभूमीने नाट्य व सिनेमा सृष्टीला अनेक कलावंत दिले आहेत. मराठी रंगभूमीला सशक्त करण्यासाठी लहान वयापासूनच रंगभूमीची माहिती व आकर्षण निर्माण होणे गरजेचे आहे. यासाठी अशा बालनाट्य शिबिराची आवश्यकता असते. यातून कलावंत, तंत्रज्ञ आणि रसिक निर्माण होण्याचे कार्य घडत असते. खऱ्या अर्थाने मराठी रंगभूमीला सशक्त करण्याचे काम राज्यभरात होणाऱ्या अशा बालनाट्य स्पर्धा आणि शिबिरातून होत असते. हे डॉ.सतीश साळुंके, डॉ.दीपा क्षीरसागर आणि आसिफ अन्सारी यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते. मराठी रंगभूमीचा उद्धार केला पाहिजे, अशी तोंडाची वाफ आपण सतत दवडतो. परंतु रंगभूमीसाठी प्रत्यक्षात काय करतो? गेलेले सुवर्ण दिवस आठवण्याशिवाय रंगभूमीच्या उत्कर्षासाठी काही करतो का? हा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.

आपल्याकडे असंख्य विषय आहेत. आपल्याकडील आदिवासींचे जगणे घ्या. देशाला स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झाली, परंतु देशाने त्यांना आपल्यात सामावून घेतले आहे, असे दिसत नाही. त्यांचे जगणे हा नाटकाचा, विषय आहे. असे विविध विषय हाताळले गेले पाहिजेत. एक नाटककार म्हणून तुम्ही का लिहिता? असे जर मला विचाराल, तर मी म्हणेन की तुम्हीच मला लिहायला भाग पाडता. तुम्ही जर प्रश्न निर्माण



केले नसते तर मी का लिहिले असते? समाजामध्ये निर्माण झालेले प्रश्न आहेत म्हणून लेखक लिहितो. माझी नाटके ज्या दिवशी कालबाह्य होतील तो दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय असेल. हे प्रेमानंद गज्वी यांचे मतही आपणास विचार करायला भाग पाडते. समाजाला दिशा देण्याचे काम लेखक–कलावंत करतात. देशातील सांस्कृतिक पर्यावरण जेवढे निकोप राहील तेवढी विधायक कामे अधिक होतील. साहित्य–सांस्कृतिक क्षेत्राचे दमन न करता सरकारने योग्य धोरण ठरवावे. चांगले सांस्कृतिक धोरण जगभरात भारताची प्रतिमा अधिक उजळ करील, असा आशावादही यावेळी व्यक्त करायला हरकत नाही. सद्याच्या काळात सांस्कृतिक क्षेत्राची मोठी कुचंबणा होत असल्याचा सूर उमटतो. भाई तुम्ही कुठे आहात? या नाटकाचे लेखक, प्रसिद्ध समीक्षक डॉ.ऋषिकेश कांबळे म्हणतात, की सध्याच्या काळात साहित्य–संस्कृती क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात दमन झाले. यापूर्वी संस्कृती व वाङ्मय क्षेत्रातील धुरिणांना विलक्षण प्रतिष्ठा दिली गेली. मात्र, सरकारला भय वाटत होते. लेखणीची ताकद सत्ता उलथवू शकते, या भयापोटी सरकारने लेखकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी केली. म्हणून अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने आणि संविधानाच्या आधाराने लेखकांना भूमिका घ्यावी लागली. सरकार योग्य दिशेने असेल, तर भय वाटण्याचे कारण नसते. तसेच निकोप सांस्कृतिक वातावरणासाठी राष्ट्रीय पातळीवर संस्थात्मक उभारणीची गरज आहे.

मराठी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करू नये, असे मत दवबिंदू पेटताना... या नाटकाचे लेखक डॉ.विलासराज भद्रे मांडतात. वेगवेगळ्या नाट्य प्रयोगाकरिता नवीन नाट्यसंस्थांची गरज आहे. जीवनमूल्ये अधोरेखित करण्याचे काम रंगभूमी करते. त्यामुळे या क्षेत्राला पोषक वातावरण तयार करणे सरकारची जबाबदारी आहे. प्रादेशिक रंगभूमी जपून लोककला व कलावंतांचे प्रश्न सोडवण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. रोजगाराच्या संधी नसल्यामुळे इंग्रजीचे स्तोम वाढले आहे. भारतीय भाषा टिकवण्यासाठी रोजगार वाढवणे आवश्यक आहे. मराठी दिनाच्या शासकीय कार्यक्रमात भाषासंवर्धन कमी होते आणि काही लोकांना त्यात रोजगार निर्मिती दिसते. साहित्य क्षेत्रात ज्येष्ठ झाल्याशिवाय संधी मिळत नाही. त्यामुळे तरुण लेखकांसाठी, रंगकर्मींसाठी राष्ट्रीय स्तरावर मंडळ स्थापन करून कार्यशाळा आयोजित करण्यात यावी. विविध उपक्रम राबवले पाहिजेत. महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका यांचा रा.शं.दातार पुरस्कार प्राप्त नाटककार डॉ.अनिलकुमार साळवे म्हणतात, की तरुण नाटककार रंगभूमीला नवीन रंगभाषा देत आहेत; त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी जुन्या–नवीन रंगकर्मींनी सुसंवाद साधने गरजेचे आहे. लोककलेचा आपल्याला समृद्ध वारसा लाभलेला असून लोकरंगभूमी संवर्धनासाठी अधिक प्रयत्न होत नसल्याची वस्तुस्थिती आहे, अशी खंत लोककलेचे प्रख्यात संशोधक डॉ.गणेश चंदनशिवे व्यक्त करतात. देशातील रंगभूमीला, सांस्कृतिक क्षेत्राला बळकटी देण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे, नाटक जगले पाहिजे. विविध पुरस्कार, समित्यांवर तज्ज्ञांची नियुक्ती करून पारदर्शी निवड करावी. नवीन लेखकाला आणि रंगभूमीवर उपजीविका असणाऱ्या कलावंत, बॅकस्टेज आर्टीस्ट, वृद्ध कलावंत यांना विविध योजनांमधून भरघोस अनुदान द्यावे. तरच रंगभूमी समृद्ध होईल, असे मला वाटते.

मुबंई–पुणे वगळता व्यावसायिक नाट्य निर्मितीचे प्रयत्न रसिकांचा प्रतिसाद घटल्याने बंद पडले आहेत. नवीन रंगकर्मींच्या प्रयत्नांकडेही प्रेक्षकांनी पाठ फिरवल्याने प्रयोगाला मर्यादा पडल्या आहेत. व्यावसायिक प्रयत्नांची नाट्य वर्तुळात चर्चा असूनही रंगकर्मी–रसिकांची अनास्था, नवोदितांची निराशा करणारी ठरली आहे. टीव्ही चॅनल्सची वाढती संख्या, मोबाइल, इंटरनेट यांनी मनोरंजनाचे अनेक पर्याय खुले केले. त्यामुळे व्यावसायिक नाटकाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळणे कठीण झाले आहे. समाजाला उन्नत आणि उदात्त दिशा देण्याचे काम लेखक– कलावंत करतात. त्यांच्या पाठिशी राज्यकर्त्यांनी उभे राहणे अपेक्षित असते. सद्यस्थितीत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होऊन लेखक–कलावंत एकाकी पडले आहेत. कलावंत, विचारवंत, लेखक यांना बोलण्याची मुभा राहिली नाही. शासकीय व्यवस्थेने लेखक व कलावंतांचा सन्मान राखण्याची गरज आहे. समाजाला दिशा देणाऱ्या लेखकांचे महत्त्व गौण ठरवले गेले आहे. ही दृष्टी बदलणे क्रमप्राप्त आहे. वयोवृद्ध व गरजू कलाकार–कलावंतांची काळजी घेणे प्रत्येक सरकारचे कर्तव्य आहे. शिवाय केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर भाषेसाठी महत्त्वाचे काम करण्याबाबत नियोजन करावे. नाट्य, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत शासकीय संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला. सोयीच्या विचारधारेची, पण सामान्य क्षमतेच्या व्यक्ती पदांवर नेमल्या गेल्या. हा प्रकार सांस्कृतिक पर्यावरणासाठी घातक आहे. राष्ट्रीय नाट्यविद्यालय, एफटीआयआय, नाट्य–साहित्य संमेलन, सेन्सॉर बोर्ड अशा अनेक ठिकाणी त्याची प्रचिती येते. याला अटकाव करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे, अशीच रास्त अपेक्षा!

---

## पिक विमा,अतिवृष्टी व दुष्काळाचे पैसे शेतकऱ्याच्या खात्यात का जमा केले जात नाहीत?–वसंत मुंडे

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारकडे केंद्र शासनाने स्वतःच्या हिश्याचे पिक विमा ,अतिवृष्टी व दुष्काळाचे पैसे देऊनही जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा शेतकऱ्याच्या हक्काचे पैसे बँकेच्या खात्यात वर्ग करण्यास वेळ का लावतात असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . महाराष्ट्रा मधील प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी शासकीय यंत्रणे मार्फत ज्या त्या शेतकऱ्याच्या खात्यामध्ये केंद्र व राज्य सरकारकडून पिक विमा अतिवृष्टीचे दुष्काळाचे अनुदान व विविध शेतकऱ्याला मिळणाऱ्या यंत्रणेद्वारे अनुदानाचे रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्याचे आदेश शासनाकडून असूनही शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे वर्ग केले जात नाहीत. प्रत्येक



जिल्ह्यातील शासकीय यंत्रणा निष्क्रिय झालेली आहे. राज्यातील जिल्हाधिकाऱ्याचे लक्ष शेतकऱ्याच्या समस्यावर नाही कारण राज्यातील निवडणुका जाहीर झालेल्या असून यंत्रणेद्वारे जी कामे सोपविले असतात ती कामे करण्यास यंत्रणा टाळाटाळ करीत आहे . मार्च एंड जवळ आलेला असतानाही शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग पैसे करण्यास संपूर्ण राज्यातील जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय यंत्रणा जबाबदार आहे असा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . शेतकऱ्याच्या बाबतीत केंद्र व राज्य सरकारचे आयात निर्यात धोरण चुकीचे असून गेली तीन वर्षापासून शेतीच्या मालाला भाव नसल्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या खचलेला आहे . शेतकऱ्याकडे शेतीमाल खरीप रब्बीचा तयार झाला की केंद्र व राज्य सरकार संयुक्तपणे परदेशातील शेतीमाल आयात करून देशातील शेतकऱ्याच्या मालाला कवडीमोल भावाने शेतकऱ्याला माल विकावा लागतो. बाजारपेठे मध्ये शेतीमालाच्या दरावर शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतोय शेतकरी हा आर्थिक दृष्ट्या संपूर्णपणे कमकुवत झालेला आहे .केंद्र व राज्य सरकारची यंत्रणा जबाबदार आहे. शासनाच्या हमी दरापेक्षा कमी भावाने बाजारपेठेत शेतकऱ्याचा माल विक्री केला जात आहे. भात कापूस बाजरी मका मुग शेंगदाणे तीळ मोहरी कांदा भाजीपाला फळे गहू ज्वारी तुरीचे भाव बाजारात पाडले जातात त्यामुळे शेतकरी सर्व बाजूंनी संकटात सापडला आहे. केंद्र सरकारने शेती मालाला स्वामीनाथन आयोगचा किमान आधारभूत हमीभावाचा आधार द्यावा कारण शेतीवरील खते बी बियाणे कीटकनाशके औषधी मजुरी दैनंदिन शेती उत्पादन खर्च लाईट बिल जीएसटी कर किरकोळ खर्च नैसर्गिक संकटे त्यामुळे शेती ही शेतकऱ्याला परवडत नाही.अतिवृष्टीचे, दुष्काळाचे अनुदान व पिक विम्याचे पैसे तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात यावेत. राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी मार्च एंड च्या आत पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केले नाही तर जिल्हाधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तिकेमध्ये अकार्यक्षम अधिकारी अशी नोंद करण्यात यावी अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केली .

---

## पथक प्रमुखांनी उमेदवारांच्या खर्चाचा अचुक हिशोब ठेवावा–निवडणुक निरीक्षक अनुराग चंद्रा

**परभणी । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ ची आदर्श आचारसंहिता मतदार संघात लागू झाली असून, उमेदवारांमार्फत नामनिर्देशन पत्रेही दाखल होणार आहे. त्याअनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकसभा मतदार संघासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक पथक प्रमुखाने उमेदवाराच्या दैनंदिन खर्चाचा अचूक हिशोब ठेवावा, असे निर्देश निवडणूक निरिक्षक (खर्च) अनुराग चंद्रा यांनी दिल्या.



भारत निवडणूक आयोगाने १७–परभणी लोकसभा मतदार संघासाठी भारतीय महसूल सेवेतील अधिकारी अनुराग चंद्रा यांची निवडणूक निरिक्षक (खर्च) म्हणुन नियुक्ती केली आहे. श्री. चंद्रा यांचे कालच परभणी येथे आगमन झाले. आज त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात १७–परभणी लोकसभा मतदार संघातील निवडणूक खर्च विषयक कामांचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रघुनाथ गावडे, पोलीस अधिक्षक रविंद्रसिंग परदेशी, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, जिपचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, अपर पोलीस अधिक्षक यशवंत काळे, मनपा आयुक्त तृप्ती सांडभोर, राज्य उत्पादन शुल्कचे अधिक्षक गणेश पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जनार्धन विधाते, प्रकल्प संचालक रश्मी खांडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी श्री. चंद्रा म्हणाले की, लोकसभा निवडणूक ही निष्पक्ष व निर्भय वातावरणात मतदान पार पाडण्यासाठी सर्व पथकांनी समन्वयाने काम करावे. निवडणूक कालावधीत मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी कपडे, दारू तसेच पैशांची वाहतूक होण्याची शक्यता असते. त्या अनुषंगाने व्हीएसटी, व्हीव्हीटी आणि एसएसटी पथकांनी व्यवहारांवर लक्ष ठेवण्याचेही त्यांनी निर्देश दिले. मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर होणारा प्रचार पाहता त्याबाबतीत खर्चाची नियमित माहिती प्रसार माध्यम कक्षाने उपलब्ध करून द्यावी. सर्व पथक प्रमुखांनी खर्चाच्या नोंदी अचूक घेऊन जिल्हास्तरीय निवडणूक खर्च नियंत्रण समितीला नियमीत अहवाल सादर करावा. लोकसभा मतदार संघाची निवडणूक ही निष्पक्ष वातावरणात पार पडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयांनी कार्य करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.प्रारंभी श्री. चंद्रा यांनी सर्व पथक प्रमुखांचा परिचय करुन घेतला. तसेच विविध विषयांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिका–यांशी संवाद साधून पुर्वतयारीचा आढावा घेतला.त्यानंतर श्री. चंद्रा यांनी लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने स्थापित करण्यात आलेले प्रसार माध्यम कक्ष, माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण कक्ष, नियंत्रण कक्ष, सी–विजील कक्ष, आदर्श आचारसंहिता कक्ष, खर्च कक्षांना भेटी देवून कामकाजाची माहिती देत सूचना दिल्या.

---

## त्यांना विकासाशी कोणतेही देणेघेणे नाही–खासदार सुप्रिया सुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–भाजप विकासासाठी नव्हे तर शरद पवार यांना संपवण्यासाठी महाराष्ट्राच्या मैदानात उतरल्याची तिखट टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. भाजपला विकासाचे कोणतेही देणेघेणे नसल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

लोकसभा निवडणुकीच्या मुद्यावरून महाराष्ट्राचे राजकारण चांगलेच तापले आहे. त्यातच सत्ताधारी व विरोधी पक्षांकडून एकमेकांवर शाब्दिक चिखलफेकही जोमाने सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना भाजपवर टीकेची झोड उठवली. त्या म्हणाल्या की, भाजप शरद पवार यांना राजकारणातून संपवण्यासाठी मैदानात उतरली आहे.भाजपला महाराष्ट्रात कोणताही विकास करायचा नाही. त्यांची भ्रष्टाचाराच्या विरोधात जाण्याची इच्छाही नाही. भाजपला बेरोजगारीविरोधात लढा द्यायचा नाही किंवा महागाईही कमी करायची नाही. भाजप केवळ सूडाचे राजकारण करत आहे. जो कुणी नेता महाराष्ट्राची आन बान शान दिल्लीत गाजवतो, त्याला राजकारणातून संपवायचे अशी कबुली भाजपनेच दिली आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.दुसरीकडे, भाजप नेते तथा मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सुप्रिया सुळे यांची टीका फेटाळून लावली आहे. तसेच पवारांच्याच कुटुंबातील पुतण्या बिभिषण म्हणून आमच्याकडे येतो, असा पलटवारही केला आहे. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, तुमचाच पुतण्या तुमच्या विरोधात जात असताना तुम्ही आमच्यावर आरोप करता. तुमच्या घरातील व्यक्ती बिभिषण म्हणून आमच्याकडे आला. शेकापचे उमेदवार सखवे भाऊ होते. पण शरद पवार यांनी त्यांचा विश्वासघात केला. तुम्ही तुमच्या कृतीने वा चुकीने स्वतःच संपत आहात, असे ते म्हणाले.

---

## उद्धव ठाकरे गट आणि काँग्रेसमधील तणावाचे कारण शरद पवार
## एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांचा आरोप


**मुंबई (वृत्तसंस्था)**–सांगली लोकसभा मतदारसंघातून दिलेल्या उमेदवारीमुळे उद्धव ठाकरे यांच्या गटाबाबत काँग्रेसच्या नेत्यांमध्ये चांगलीच नाराजी पसरली आहे. काँग्रेसचे नेते उघडपणे उद्धव ठाकरे गटावर टीका करत आहेत. मात्र, ही सर्व शरद पवार यांची खेळी असल्याचा आरोप एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे.

सांगली लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाच्या पक्षाचे अस्तित्व नाही. ती जागा ते कधी लढले नाहीत, त्या जागेवर ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये तिढा कसा काय निर्माण होईल? मुळात हा तिढा निर्माण व्हावा म्हणून ही ठरवून खेळी केली, असा आरोप आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे.शरद पवार यांनी ठाकरे गटाने काँग्रेसमध्ये भांडण लावले असल्याचे देखील ते म्हणाले. ही शरद पवारांची खेळी असून त्यांनी केलेल्या खेळीमध्ये उद्धव ठाकरे यांचा गट अडकला असल्याचा दावा त्यांनी केला आहे.उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने सांगली लोकसभा मतदारसंघातून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. ठाकरे या जागेसाठी आग्रही होते मात्र, काँग्रेस पक्षाने या मतदारसंघावरील आपला दावा अद्याप सोडलेला नाही. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा असताना तो मतदार संघ काँग्रेसला सोडण्यात आला आहे. त्या बदल्यात शिवसेनेला सांगली लोकसभा मतदारसंघ देण्यात यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांच्या गटाने केली होती. मात्र, काँग्रेस पक्षातील स्थानिक पदाधिकारी तसेच राज्य पदाधिकारी देखील या मागणीसाठी मान्य नव्हते. या विषयी दोन्ह पक्षातील नेत्यांमध्ये चर्चा सुरू असताना देखील उद्धव ठाकरे यांनी सांगली लोकसभा मतदारसंघातून चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते उद्धव ठाकरे यांच्यावर जाहीरपणे टीका करत आहेत.काँग्रेस पक्षाचे नेते विशाल पाटील हे सांगली लोकसभा मतदारसंघातून आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न करत होते. त्यांना ही उमेदवारी देण्यात यावी यासाठी विश्वजीत कदम हे देखील आग्रही होते. स्थानिक सर्व पदाधिकारी सांगली लोकसभा मतदारसंघासाठी आग्रही असताना राज्यपातळीवरील नेते देखील सांगली लोकसभा मतदारसंघ ठाकरे गटाला सोडण्यास इच्छुक नव्हते. या संदर्भात दोन्ही पक्षाच्या नेत्यांमध्ये चर्चा सुरू होती. मात्र असे असताना शिवसेनेच्या वतीने अचानक यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये सांगली लोकसभा मतदारसंघातून चंद्रहार पाटील यांना उमेदवारी देखील जाहीर करण्यात आली. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये चांगलाच तणाव निर्माण झाला आहे. या तणावाचे मुख्य कारण हे शरद पवार असल्याचा आरोप आमदार संजय शिरसाट यांनी केला असल्याचा दावा माध्यमांशी बोलताना केला आहे.



# मोदींवर टीका केली तर तुरुंगात टाकतात, माझ्यावर टीका करू द्या:संजय राऊत यांचे प्रकाश आंबेडकर यांना प्रत्युत्तर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–नरेंद्र मोदींवर टीका केली तर ते तुरुंगात टाकतात मात्र, माझ्यावर टीका करू द्या, अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांना प्रत्युत्तर दिले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी संजय राऊत खोटे बोलत असल्याचा आरोप केला होता. मात्र, मी काय खोटे बोललो, ते सांगा असे म्हणत संजय राऊत यांनी आंबेडकरांच्या टीकेला उत्तर दिले. उद्धव ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यामध्ये सर्वात आधी युती झाली होती. आमच्यात खोटे काहीच नाही. आम्ही अकोल्यासह चार जागांचा प्रस्ताव वंचित बहुजन आघाडीला दिला होता. यामध्ये रामटेक या मतदार संघाचाही समावेश होता. रामटेकमध्ये आमचा विद्यमान खासदार आहे. असे असतानाही आम्ही रामटेकची जागा वंचित बहुजन आघाडीला देण्याची तयारी दाखवली होती. यामध्ये काहीही खोटे नसल्याचा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. आमचा चार जागांचा प्रस्ताव होता, पुढे आम्ही त्यांना पाच जागा देण्याची तयारी देखील दाखवली असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.खासदार संजय राऊत यांनी प्रकाश आंबेडकर यांनी केलेला आरोपाला प्रत्युत्तर दिले आहे. गेल्या दोन दिवसापासून पाच जागा देण्याचेही बोलणे झाले आहे. महाविकास आघाडी कडून कोणीही खोटे बोलत नाही, असे मला वाटते. सिल्वर ओकवर स्वतंत्र कोणतीही चर्चा झालेली नसल्याचा दावा देखील खासदार संजय राऊत यांनी केला. अकोल्याची जागा ही कॉंग्रेसकडे आहे, त्यामुळे या जागेबद्दल शिवसेनेचा काही संबंध नसल्याचे संजय राऊत यांनी स्पष्ट केले. वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्यासाठी दिल्लीतूनही प्रयत्न झाले असल्याची माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली. आम्ही सुरुवातीपासून प्रकाश आंबेडकर यांना सन्मानानेच वागणूक दिली असल्याचा दावा देखील त्यांनी केला.प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत महाविकास आघाडीची चर्चा सुरू होती. त्यांच्याशी स्वत: शरद पवार आणि उद्धव ठाकरे, नाना पटोले




यांनी चर्चा केली आहे. यात खोटे काहीच नाही. त्यांनी महाविकास आघाडीसोबत यावे, ही आमची भूमिका आजही आहे. त्यांच्या बद्दल आमच्या मनामध्ये आदर आहे, असेही संजय राऊत यांनी म्हटले आहे. ते मोठे नेत आहेत, त्यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली असल्याचेही राऊत म्हणाले.तीन तारखेला दुपारी बारा वाजता महाविकास आघाडीची पत्रकार परिषदेत आहे. या पत्रकार परिषदेमध्ये महाविकास आघाडीतील सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळतील. असा दावा देखील खासदार संजय राऊत यांनी केला आहे. आंबेडकरांसाठी शेवटपर्यंत प्रयत्न केले असल्याचे देखील खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. महाविकास आघाडी ही राज्यातील ४८ जागा लढणार असून ४८ जागा जिंकण्याचा आम्हाला आत्मविश्वास असल्याचा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे.मैत्रीपूर्ण लढत ही आपल्या विरोधी पक्षाला मदत करण्यासाठी केली जाते. काँग्रेस हा समजदार पक्ष आहे. त्यामुळे सांगली लोकसभा मतदार संघात मैत्रीपूर्ण लढत होणार नसल्याचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला लोकशाहीत टीका करण्याचा अधिकार दिला आहे. नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली तर ते तुरुंगात टाकतात. मात्र, माझ्यावर टीका केली तर असा कोणताच आदेश देण्यात आलेला नाही. असे म्हणत खासदार संजय राऊत यांनी बाळासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. त्यामुळे टीका करणाऱ्यांना करू द्या, अशा शब्दात संजय राऊत यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या टीकेला टोलवले आहे.अभिनेता गोविंदा यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला आहे. यावर देखील खासदार संजय राऊत यांनी टीका केली. भारतीय जनता पक्षाच्या एका नेत्यानेच गोविंदा यांच्यावर अंडरवर्ल्डशी संबंध असल्याचे आरोप केले होते. मात्र, तेच गोविंदा आता भाजपच्या मित्र पक्षाकडून लोकसभा निवडणूक लढवत आहेत. हे त्यांना मान्य आहे का? असा प्रश्न खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. राम नाईक यांनी त्या वेळी केलेली टीका चूकीची होती का? असेही खासदार राऊत यांनी म्हटले आहे.

## साताऱ्याचा उमेदवार २–३ दिवसांत ठरवणार

# कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेणार,श्रीनिवास पाटलांच्या माघारीनंतर पवारांचे विधान

**सातारा (वृत्तसंस्था)**–साताऱ्यात उमेदवार कोण असेल यासंदर्भात २ ते ३ दिवसांमध्ये निर्णय जाहीर केला जाईल असे सूचक विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. शरद पवार आज सातारा दौऱ्यावर होते. यादरम्यान, त्यांनी पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांसोबत संवाद साधला.



सातारा मतदारसंघातून श्रीनिवास पाटील यांनी निवडणूक लढण्यास नकार दिल्याची माहिती शरद पवार यांनी दिली आहे. सातारा मतदारसंघामधील राज्यसभेचे विद्यमान खासदार उदयनराजे भोसले यांनी दिल्लीतून चार ते पाच दिवसांच्या दौऱ्यानंतर पुन्हा दाखल आपण निवडणूक लढवणारच असे जाहीर केले आहे. त्यानंतर महाविकास आघाडीकडून इथे उमेदवकार कोण असेल या चर्चा सुरू होत्या.याबाबत बोलतांना शरद पवार म्हणाले, ''श्रीनिवास पाटील यांनी पुन्हा लोकसभा निवडणुकीसाठी उभे राहावे, अशी इच्छा होती. पण त्यांनी प्रकृतीचे कारण देत उमेदवारी घेण्यास नकार दिला. माझ्याकडून मतदारांना न्याय देता येणार नाही. त्यामुळे मी निवडणूक लढवणार नाही, असं श्रीनिवास पाटील म्हणाले'', असे शरद पवार म्हणाले.तसेच ''यशवंतराव चव्हाणानंतर साताऱ्याचं कायचम राष्ट्रवादीवर प्रेम राहिलं आहे. श्रीनिवास पाटील यांनी तब्बेतीचे कारण देत निवडणूक लढवण्यास नकार दिला आहे. आम्ही त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. मात्र प्रकृतीसंदर्भातील कारण त्यांनी दिल्याने नाइलाजाने आम्ही त्यांची भूमिका मान्य केली आहे. मात्र तरी पक्षासाठी सर्व काम करेन असं श्रीनिवास पाटलांनी सांगितले आहे, अशी माहिती शरद पवारांनी दिली.शरद पवार यांनी सातारच्या लोकसभेसाठी तीन तीन चार नावे चर्चेत असल्यास सांगितले. यामध्ये शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, सुनील माने तसेच सत्यजित पाटील यांची नावे चर्चेत असल्याचे ते म्हणाले. आम्ही यावरती चर्चा करून उमेदवार घोषित करू अशी माहिती यावेळी शरद पवार यांनी दिली.याशिवाय सातारा लोकसभा मतदारसंघातून स्वतः शरद पवार यांनी निवडणूक लढवावी, असा आग्रह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी शरद पवारांकडे धरला होता. मात्र, राज्याची जबाबदारी असल्याने मला अधिक लक्ष द्यावे लागत आहे. त्यामुळे मला तुमची इच्छा पूर्ण करता येणार नाही, असे शरद पवार कार्यकर्त्यांना म्हणाले.तसेच वंचितबाबत बोलतांना शरद पवार यांनी सूचक विधान केले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी अजूनही आमच्यासोबत यावे अशी आम्हाला अपेक्षा आहे. त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्यासोबत चर्चा सुरू आहे. मात्र जागेचा प्रश्न आहे असे शरद पवार म्हणाले. तसेच मराठा आंदोलक मनोज जरांगे आणि माझी चर्चा झालेली नाही. ते उपोषणाला बसले होते त्यावेळी एकदाच त्यांना मी भेटलो, असे पवार यांनी सांगितले.तसेच प्रफुल्ल पटेल यांना सीबीआयकडून मिळालेल्या क्लिनचिटवर शरद पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रफुल्ल पटेलांना क्लिनचिट देणारच. एककाळ असा होतो जेव्हा ते आमच्याबरोबर होते तेव्हा आम्ही चिंतेत होतो. आता सध्या एक चर्चा सूरू आहे ती म्हणजे जेलमध्ये जाण्यापेक्षा भाजपसोबत गेलेलं बरं असा त्याचा अर्थ आहे, असा टोला शरद पवारांनी लगावला आहे.दरम्यान, सातारा लोकसभा मतदारसंघातून कोणाला उमेदवारी द्यायची, याबाबत कार्यकर्त्यांनी काही सूचना करत नावे सूचवली आहेत. यावर पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांसोबत सविस्तर चर्चा करून एक ते दोन दिवसांत निर्णय घेऊ. यशवंतराव चव्हाणानंतर साताऱ्याचं कायचम राष्ट्रवादीवर प्रेम राहिलं आहे. तसेच महाविकास आघाडीची जागावाटपाची चर्चा पूर्ण झाल्याचे विधानही शरद पवारांनी केले.

## आता बच्चू कडूंनी तडजोडी करून झोपेचे सोंग घेऊ नये

# इतरांप्रमाणे तलवारी म्यान करणार नाहीतअसा विश्वास–आ.रोहित पवार

**पुणे (वृत्तसंस्था)**–भाजपने नवनीत राणा यांना अमरावतीमधून लोकसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र त्यांच्या उमेदवारीला प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांनी कडाडून विरोध केला आहे. तसेच अमरावती लोकसभा मतदार संघामध्ये नवनीत राणा यांच् याविरोधात उमेदवार देणार असल्याचे कडू यांनी जाहीर केले आहे. आमदार बच्चू कडू यांच्या भूमिकेचे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी स्वागत केले आहे. तसेच आता त्यांनी आपली तलवार मान्य करू नये, असा सल्लाही दिला आहे.

नवनीत राणा यांना निवडणुकीत पाडणार, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे. इतकेच नाही, तर नवनीत राणा यांच्याविरोधात आम्ही उमेदवार देऊ, असेही बच्चू कडू यांनी म्हटले आहे. त्यांच्या या निर्णयाचे स्वागत करत आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून त्यांना भूमिका कायम ठेवण्याचे आवाहन



केले आहे. या संदर्भात रोहित पवार म्हणाले की, 'बाबासाहेबांचं संविधान आणि छत्रपतींचा स्वाभिमान या देशात जिवंत राहायला हवा, यासाठी आजची ही लढाई आहे. ही निवडणूक नसून लढाई म्हणून आम्ही स्वीकारू. बच्चू कडू साहेबांची ही भूमिका सर्वसामान्य जनतेची भावना बोलून दाखवणारी आहे. देशभरात निवडणूक ही आता निवडणूक राहिलेली नाही तर जनतेची लढाई झालेली आहे आणि जेंव्हा जनताच निवडणूक हातात घेते तेंव्हा काय निकाल येतो ते कसबा पोटनिवडणुकीत आपण बघितलंय. तसाच निकाल ४ जूनलाही येईल यात काही शंका नाही.'आपल्या पोस्टमध्ये आमदार रोहित पवार म्हणाले की, 'मधला काही काळ बच्चू कडू साहेब भरकटले असले तरी उशिरा का होईना त्यांनी जागं होऊन जनतेची बाजू घेतली याबद्दल त्यांचे आभार. आता केवळ 'सागर' किंवा 'वर्षा'वर बैठक होऊन तडजोडी करून त्यांनी झोपेचे सोंग घेऊ नये ही अपेक्षा! ते स्वाभिमानी आणि लढाऊ असल्याने देशाच्या संविधांनासाठी आणि छत्रपतींच्या स्वाभिमानासाठी तरी ते इतरांप्रमाणे उपसलेली तलवारी म्यान करणार नाहीत, असा विश्वास वाटतो!'

# वसंत मोरेंनी घेतली प्रकाश आंबेडकरांची भेट ; येत्या २–3 दिवसांत निर्णय घेणार

## सकारात्मक चर्चा झाल्याची दोघांची माहिती

**पुणे (वृत्तसंस्था)**–काहीच दिवसांपूर्वी मनसेला राम राम ठोकलेले वसंत मोरे यांनी आज वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली आहे. मोरे हे पुण्यातून लोकसभा निवडणूक लढवण्यात इच्छुक आहेत. त्यामुळे या भेटीमध्ये सकारात्मक चर्चा झाली असे प्रकाश आंबेडकर यांनी भेटीनंतर म्हंटले आहे. तसेच येत्या दोन चार दिवसात वसंत मोरे आणि महाविकास आघाडी सोबतची समीकरणे याबाबत निर्णय घेईल असेही ते म्हणाले.

या भेटीनंतर मोरे म्हणाले, ''आंबेडकर यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली. पुणे लोकसभेच्या निवडणुकीला अजून वेळ आहे. त्या नुसार येणाऱ्या दोन- चार दिवसांमध्ये चित्र स्पष्ट होईल. मी वंचितच उमेदवार असेल का याबाबत प्रकाश आंबेडकर हे निर्णय घेतील'', असे वसंत मोरे म्हणाले.

तर आंबेडकर यांनीही भेटीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे. ''नव्या राजकारणाची सुरुवात कशी होणार आणि ती कोण- कोण करणार याबाबत येत्या दोन चार दिवसात निर्णय जाहीर करणार आहे. काही गोष्टी मी उघडपणे सांगू शकत नाही. कारण अजूनही घटना घडत आहेत. महायुतीसोबतच्या समीकरणावर देखील दोन तारखेला स्पष्ट निर्णय घेणार'', असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले.दरम्यान, वसंत मोरे यांनी आधी महाविकास आघाडीचे नेत्यांच्या भेटी घेतल्या होत्या. मात्र



महाविकास आघाडीमध्ये पुणे लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी काँग्रेसचे नेते रवींद्र धंगेकर यांना देण्यात आली आहे. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या सोबत वसंत मोरे उमेदवारी संदर्भात चर्चा करण्याची शक्यता आहे.या भेटीआधी वसंत मोरे म्हणाले होते की, ''आज मी मुंबईला त्यांची भेट घेणार आहे. मागील आठवड्यात भेटीसाठी चर्चा झाली होती. मात्र ती भेट होऊ शकली नाही. आज आंबेडकर यांनी मला भेटीसाठी वेळ दिला आहे. पुण्यातून मी अर्ज भरणारच आहे. मात्र त्या संदर्भात पाठिंब्यासाठी मी आज आंबेडकर यांच्याशी चर्चा करेल.पुण्याचा विकास हेच माझे उद्दिष्ट्ये आहे'', असे वसंत मोरे म्हणाले.दरम्यान, महाविकास आघाडीसोबत जाणार नसल्याची घोषणा केल्यानंतर वंचित बहुजन आघाडीने आतापर्यंत आठ उमेदवार हे जाहीर केले आहेत. त्यांनी पुणे लोकसभेसाठी कोणताही उमेदवार घोषित करण्यात आला नाही आहे. त्यामुळे वसंत मोरे हे प्रकाश आंबोडकरांची भेट घेणार आहेत.

# एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची पहिली यादी जाहीर ; ८ पैकी ७ खासदारांना पुन्हा संधी

## पहिल्या यादीत श्रीकांत शिंदे यांचेही नाव नाही

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वतीने उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये आठ लोकसभा मतदारसंघाचा समावेश आहे. यात हिंगोली लोकसभा मतदारसंघातून हेमंत पाटील तर बुलडाणा लोकसभा मतदारसंघातून प्रतापराव जाधव यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हातकलंगले लोकसभा मतदारसंघातून धैर्यशील माने तर कोल्हापूर मधून संजय मंडलीक यांना संधी देण्यात आली आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातून श्रीरंग बारणे यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उमेदवारी दिली आहे. विशेष म्हणजे पहिल्या यादीत कल्याण लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नावाचा समावेश करण्यात आलेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पहिल्या यादीमध्ये आठ पैकी सात विद्यमान खासदारांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघातून सदाशिवराव लोखंडे यांना पुन्हा एकदा शिवसेनेच्या वतीने उमेदवारी देण्यात आली आहे. तर दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून राहुल शेवाळे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र डॉ. श्रीकांत शिंदे हे कल्याण लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार आहेत. मात्र, पहिल्या यादीमध्ये श्रीकांत शिंदे यांचे नाव नाही. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शिवसेनेला लोकसभेसाठी महाराष्ट्रात किती जागा मिळणार, याबाबत अद्याप निर्णय जाहीर करण्यात आलेला नाही. असे असताना एकनाथ शिंदे यांनी केवळ आठ उमेदवारांची नावांची घोषणा केली आहे. मात्र, इतर ठिकाणी खासदार नाराज नको, म्हणून या पहिल्या यादीत शिंदे यांचे सुपुत्र डॉ. श्रीकांत शिंदे यांचे नाव टाळण्यात आले का? असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.नाशिक लोकसभा मतदारसंघात हेमंत गोडसे यांना श्रीकांत शिंदे यांनी आधीच उमेदवारी जाहीर केली होती. त्यानंतर हेमंत गोडसे यांच्या नावाला भाजपमधून जोरदार विरोध झाला होता. हेमंत गोडसे यांनी देखील विरोधानंतर जोरदार शक्तिप्रदर्शन केले होते. मात्र, तरी देखील नाशिक लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष किंवा महायुतीत आल्यास मनसेला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे नाशिक लोकसभा मतदारसंघातील उमेदवाराची घोषणा देखील शिंदे यांच्या पहिल्या यादीत करण्यात आलेली नाही.

| | मतदार संघ | उमेदवार |
|---|---|---|
| १ | ३० - मुंबई दक्षिण मध्य | श्री राहुल शेवाळे |
| २ | ४७ - कोल्हापुर | श्री संजय मंडलीक |
| ३ | ३८ - शिर्डी (अजा) | श्री सदाशिव लोखंडे |
| ४ | ५ - बुलढाणा | श्री प्रतापराव जाधव |
| ५ | १५ - हिंगोली | श्री हेमंत पाटील |
| ६ | ३३ - मावळ | श्री श्रीरंग बारणे |
| ७ | ९ -रामटेक (अजा) | श्री राजू पारवे |
| ८ | ४८ -हातकणंगले | श्री धैर्यशिल माने |

# सामान्य निरीक्षकांनी घेतला निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा

## नियोजन सभागृह येथे नोडल अधिका-यांची बैठक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने १३ - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी सामान्य निवडणूक निरीक्षक, कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव यांनी जिल्ह्यातील तसेच चंद्रपूर लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.नियोजन सभागृह येथे निवडणुकीशी संबंधित सर्व यंत्रणा तसेच नोडल अधिका-यांची आढावा बैठक श्री. जाटव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक सुजीत दास, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, सहायक जिल्हाधिकारी (आर्णी) सुहास गाडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल आदी उपस्थित होते.

लोकेशकुमार जाटव म्हणाले, निवडणुकीसाठी मतदानाचे साहित्य घेऊन जातांना डिस्पॅच सेंटरमध्ये आवश्यक प्रमाणात मनुष्यबळ ठेवावे. तसेच संबंधित यंत्रणेतील अधिकारी व कर्मचा-यांना वैयक्तिक मॅसेज जाणे आवश्यक आहे. मतदान झाल्यानंतर ईव्हीएम गोळा करतांना अतिशय दक्ष राहावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.यावेळी सादरीकरण करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी, जिल्ह्याचा आढावा, मतदान प्रक्रियेमध्ये असलेले मनुष्यबळ व्यवस्थापन, अधिकारी - कर्मचा-यांचे प्रशिक्षण, साहित्य व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, मतदान यंत्र सुरक्षा व व्यवस्थापन, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, निवडणूक खर्च व्यवस्थापन, मतपत्रिका, पोस्टल बॅलेट, मतदार मदत केंद्र, तक्रार निवारण केंद्र, सी - व्हीजील प, ८५ वर्षांवरील व्यक्तिंना तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेल्या व्यक्तिंना गृहमतदानाची सुविधा आदींबाबत निवडणूक निरीक्षकांना माहिती दिली.बैठकीला सर्व उपविभागीय अधिकारी, नोडल अधिकारी व विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.



## लालसु आत्राम हे भामरागड रा.कॉ.(अजित पवर गट )चे नवीन तालुका कार्यकारी अध्यक्ष नियुक्त



**भामरागड । प्रतिनिधी**
देशभरात लोकसभा निवडणुकीचा चाहूल लागताच सर्व राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणात घडामोडी घडायला सुरुवात झाली.याचे एक भाग म्हणून तडगाव येथील लालसु मादी आत्राम यांना भामरागड तालुका कार्यकारी अध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र धर्मराव बाबा आत्राम मंत्री अन्न व औषध प्रशासन यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी देवाशिस बिस्वास, मल्ला मडावी, तलांडी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार दुय्यम निबंधक कार्यालय

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
वार्षिक बाजार मुल्यदर तक्ते १ एप्रिल रोजी प्रसिद्ध होत असल्याने मार्च महिन्यात दस्तऐवज नोंदणीसाठी होणारी गर्दी व आर्थिक वर्ष २०२३-२४ या वर्षाचा इष्टांक पूर्ण करण्याच्या दृष्टीने, तसेच महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना या संबंधीचे कामकाज व दस्त नोंदणीसाठी आलेल्या सुट्ट्या लक्षात घेता जनतेच्या सोयीच्या दृष्टीने दस्त नोंदणीसाठी जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक, सह जिल्हा निबंधक कार्यालये २९ ते ३१ मार्च २०२४ रोजी सुरू राहणार आहेत.दुय्यम निबंधक कार्यालयात मार्च महिन्यात दस्त नोंदणीसाठी पक्षकारांची गर्दी होते. महाराष्ट्र मुद्रांक शुल्क (अभय योजना) या संबंधीचे कामकाज करण्यासाठी तसेच दस्त नोंदणीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात पक्षकारांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने सह जिल्हा निबंधक वर्ग- १ व मुद्रांक जिल्हाधिकारी, चंद्रपूर हे कार्यालयदेखील अभिनिर्णय, अभय योजना तसेच इतर कामकाजासाठी सुरू राहणार आहे, अशी माहिती सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी ए.ए.तांदळे यांनी दिली आहे.

## ३१ मार्च पूर्वी करा ग्रीकल्चर ट्रॅक्टर,पॉवर टिलर;संवर्गातील नवीन वाहनांची नोंद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
शासनाने ग्रीकल्चर ट्रॅक्टर, पॉवर टिलर, कंस्ट्रक्शन इक्विपमेंट व्हेइकल (उएत) व कम्बाईन हार्वेस्टर या संवर्गातील नवीन वाहन नोंदणी विषयी वायप्रदूषण मानके व इंजिन क्षमता या अनुषंगाने नोंदणी करीता वैधता जारी केली आहे. यानुसार या संवर्गातील वाहनांची नोंदणी ३१ मार्च २०२४ पूर्वी करणे आवश्यक असल्याचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे कळविण्यात आले आहे.
३१ मार्चपूर्वी नोंदणी करणे आवश्यक असलेल्या संवर्गात ग्रीकल्चर ट्रॅक्टर, पॉवर टिलर व कम्बाईन हार्वेस्टर ३७ किलो व्हॅट पेक्षा जास्त परंतु ५६० किलो व्हॅटपर्यंत (पावर) तसेच ३७ किलो व्हॅट पेक्षा (पावर), कंस्ट्रक्शन इक्विपमेंट व्हेईकल (उएत) ३७ किलो व्हॅट पेक्षा जास्त परंतु



५६० किलो व्हॅटपर्यंत (पावर) तसेच ३७ किलो व्हॅट पेक्षा (पावर) या वाहनांचा समावेश आहे. सर्व वाहन वितरक व वाहन मालक यांच्या सोयीसाठी ३१ मार्च पर्यंत सार्वजनिक सुटीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवण्यात आले असल्याने वाहन नोंदणी करणे सोयीचे जाणार आहे. तरी या संवर्गातील सर्व वाहन वितरक व वाहन मालक यांनी नवीन वाहनांची नोंद करून घेण्याचे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांनी केले आहे.


## माजरी पोलिस ठाण्याचे नवनियुक्त ठाणेदार सारंग मिराशी यांचे स्वागत

**माजरी । प्रतिनिधी**
माजरी पोलिस स्टेशनला अल्पावधीसाठी आलेले ठाणेदार योगेश खरसान यांची नुकतीच बदली झाल्याने त्यांचे जागेवर ठाणेदार म्हणून सारंग मिराशी रुजू झाले आहे. त्यांची व्हॉइस ऑफ मीडियाचे पदाधिकारी व सदस्य यांनी सदिच्छा भेट घेतली व त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील अनेक समस्या विषयी चर्चा करण्यात आली.अनेक वर्षनंतर माजरी ठाण्यात अनुभवी ठाणेदार सारंग मिराशी रुजू झाले असून त्यांच्या प्रती जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. दरम्यान व्हॉइस ऑफ मीडियाच्या वतीने त्यांची सदिच्छा भेट घेतली असता, त्यांनी आपण सर्व सामान्य जनतेच्या सेवेसाठी कार्य करणार असून पोलिस स्टेशनला येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला न्याय देवून त्यांचे समाधान कसे करता येईल यासाठी सदैव तत्पर राहणार आहे. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आपले प्रयत्न असून याला जनतेचे सुद्धा सहकार्य लाभने तेवढेच गरजेचे आहे. खऱ्या गुन्हेगारांवर आपण कायदेशीर कारवाई करणार आहे. गुन्हेगारीवर आळा बसविण्यासाठी आपण पूर्णपणे प्रयत्न करणार. परिसरातील नागरिकांचा आपण सन्मानच करणार आहे असे ते या भेटीत पत्रकारांशी बोलत होते. याक्षणी व्हॉइस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांनी नविन ठाणेदारासोबत माजरी पोलिस स्टेशन हद्दीतील अनेक विषयावर साधक बाधक चर्चा केली.याप्रसंगी व्हॉइस ऑफ मीडियाच्या भद्रावती तालुका कार्यकारिणीचे सहसचिव रवि भोगे, संघटक चैतन्य कोहळे, सदस्य रवि कुडूदुला उपस्थित होते.



## सखाराम बोबडे पडेगावकर यांचे कडून एका उमेदवारी अर्जाची खरेदी

**परभणी । प्रतिनिधी**
मागील पाच वर्षापासून लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी करत असलेले सखाराम बोबडे पडेगावकर यांनी आज गुरूवारी परभणी जिल्हा अधिकारी कार्यालयात अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज खरेदी केला.
शेतकरी, मेंढपाळ कुटुंबात जन्म घेतलेले सखाराम बोबडे पडेगावकर यांनी मागची २०१९ ची लोकसभा निवडणूक अपक्ष म्हणून लढवली होती. यात त्यांना सतरा उमेदवारापैकी सहाव्या क्रमांकाची ६१८५ अशी मते मिळाली. २०१९ च्या निवडणुकीच्या निकालानंतर सखाराम बोबडे पडेगावकर यांनी आपल्या कामाचा धडाका सुरू ठेवला. शेतकरी, मेंढपाळ, कष्टकरी, मजूर, विद्यार्थी सर्व वर्गातील लोकांना त्यांनी मदत केलेली आहे. या कामाच्या जोरावर २०२४ ची निवडणूक लढवणार असे त्यांनी यापूर्वीच सांगितलेले होते .आज दिनांक २८ मार्च रोजी परभणी जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक कक्षात त्यांनी आपला उमेदवारी अर्ज खरेदी केला. या अर्जात ते अपक्ष म्हणून निवडणूक लढवणार असल्याचे उल्लेख केलेला आहे. यावेळी धनगर साम्राज्य सेनेचे महाराष्ट्र संपर्कप्रमुख रविकांत हरकळ , अकोल्याचे उमेदवार संदीप गवई, डॉक्टर छगन पांचाळ आदीसह सहकारी उपस्थित होते.




## तळोधी बा येथे पोलीस विभागामार्फत रूट मार्च



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**
आगामी लोकसभा निवडणूक तसेच रमजान ईद, रामनवमी,डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सण- उत्सवानिमित्त पोलीस स्टेशन मधील कायदा व सूव्यवस्था अबाधित राहून लोकसभा निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडावे याकरिता उपविभागीय पोलीस अधिकारी सा.ब्रह्मपुरी यांच्या मार्गदर्शनात नागभीड तालुक्यातील तळोधी( बा )येथे रूट मार्च काढण्यात आला.सदर रूट मार्च तळोधी शहरातून राम मंदिर ,बाजार चौक,जामा मस्जिद, बामणी वार्ड,भट्टी चौक,सोनवट, नवीन बस स्टॉप मार्गाने पोलीस स्टेशन पर्यंत रुट मार्च समाप्त करण्यात आला.
यामध्ये ३ पोलीस अधिकारी,६ पोलीस अंमलदार,८ होमगार्ड सैनिक तसेच सीआयएसएफचे ०१अधिकारी व २५ जवान हजर होते.

## भाजपने मैत्री जपावी ; अन्यथा शिवसैनिकांमध्ये चीड निर्माण होईल

### जागावाटपावरून अर्जुन खोतकर यांचा भाजपला इशारा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–भाजपाने शिवसेनेबरोबरची मैत्री जपावी, अन्यथा शिवसैनिकांमध्ये चीड निर्माण होईल असे विधान शिंदे गटाचे नेते अर्जुन खोतकर यांनी केले आहे. महायुतीत सध्या सुरू असलेल्या जागावाटपावरून त्यांनी भाजपला इशारा दिला आहे. तसेच शिवसेनेच्या ज्या जागा होत्या, त्या जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर करायला हव्या होत्या असेही ते म्हणाले.
महायुतीच्या जागावाटपावर अर्जुन खोतकर यांनी भाष्य केले आहे. भाजपला उद्देशून ते म्हणाले, ''शिवसेनेचे सर्व खासदार विश्वास ठेवून आपल्याबरोबर आले आहेत. त्यामुळे तेवढी तरी मैत्री जपली पाहिजे. छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, यवतमाळ, नाशिक या जागा शिवसेनेच्या आहेत. तरीही तुम्ही या जागा मागत असाल तर सहाजिकच शिवसैनिकांच्या मनामध्ये चीड निर्माण होईल'', असे अर्जुन खोतकर भाजपला म्हणाले.पुढे



बोलतांना ते म्हणाले, ''आपल्या हक्काच्या जागा अशा पद्धतीने दबावतंत्राने मागितल्या तर हे फार वाईट असून याचा संदेश चांगला जात नाही. भारतीय जनता पक्षाने २० जागा जाहीर केल्या तर शिंदेंनीही १२ किंवा १३ खासदारांच्या जागा जाहीर केल्या पाहिजे होत्या. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शब्द पाळणारे आहेत'', असे खोतकर म्हणाले.तसेच ''पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी जे ठरवून दिले ते केले. पण शिवसेनेच्या ज्या जागा होत्या, त्या जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर करायला हव्या होत्या. आता नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांना चारवेळा शक्तीप्रदर्थन करावे लागते आहे. त्यामुळे लोकांमध्ये दुही निर्माण होण्याची शक्यता असते. त्यानंतर यातूनच पुढे काहीतरी वेगळे घडते'', असे सूचक विधान अर्जुन खोतकर यांनी दिला.दरम्यान, लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाने आपली पहिली यादी जाहीर केली. यामध्ये एकूण नऊ मतदारसंघातील उमेदवारांचे नावे जाहीर करण्यात आले. यामध्ये मुंबई दक्षिण मध्यमधून राहुल शेवाळे, कोल्हापूरमधून संजय मंडलीक, शिर्डीमधून सदाशिव लोखंडे, बुलढाणा येथून प्रतापराव जाधव, हिंगोलीमधून हेमंत पाटील, मावळमधून श्रीरंग बारणे, रामटेकमधून राजू पारवे, हातकणंगले येथून धैर्यशिल माने यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

## सांगलीत द्राक्ष मळ्याच्या कंपनीमध्ये तब्बल २४५ कोटी रुपयांचे एमडी जप्त

**सांगली**–सांगली जिल्ह्यात द्राक्षांच्या मळ्यात असलेल्या मेफेड्रोन उत्पादन कारखान्याचा मुंबई पोलिसांनीपर्दाफाश करून तब्बल २४५ कोटी रुपयांचे एमडी जप्त केल्याचेपोलिसांनी सांगितले. या वेळीमेफेड्रोन उत्पादन करणाऱ्या प्रवीण शिंदेसह सहा जणांना अटककरण्यात आली आहे. गेल्यामहिन्यात मुंबईत ७ कोटी रुपयांचेड्रग्ज जप्त करण्यात आले होते. यात काही जणांना अटक करण्यात आली होती. त्यांच्या चौकशीदरम्यानसांगलीतून एमडी आणल्याचे समोर आले होते. त्यानंतर पोलिसांनीकारवाई करून सांगलीत धाडमारून कारखाना उद्ध्वस्त केला.
मुंबई पोलिसांनी दिलेल्यामाहितीनुसार, सोमवारी सांगलीजिल्ह्यातील इरळी गावातील एकाशेतावर छापा टाकून १२२.५ किलोमेफेड्रोनसह कृत्रिम उत्तेजक द्रव्यजप्त केले. याप्रकरणी पोलिसांनीआतापर्यंत एकूण २५२ कोटी रुपयांचेअमली पदार्थ जप्त केले. यातीलमुख्य आरोपी शिंदे हा मूळचा सांगलीजिल्ह्यातील तासगावचा रहिवासीअसून त्याने इयत्ता दहावीपर्यंतशिक्षण घेतले. मात्र, अमली पदार्थबनवण्यात तो एक्स्पर्ट असल्याचेसांगण्यात आले. शिंदे याने त्याच्यासहकाऱ्यांसह इरळी गावातप्रयोगशाळा स्थापन करण्यापूर्वीमेफेड्रोन उत्पादनाचे प्रशिक्षणघेण्यासाठी उत्तर प्रदेशला भेट दिलीहोती. सोमवारी अटक करण्यातआलेल्या सहा जणांपैकी पाचसांगलीतील शेतकरी असल्याचेपोलिसांनी सांगितले. याप्रकरणीपोलिस तपास करत आहेत.आरोपींनी गावात द्राक्षांच्या मळ्यांनी वेढलेली १२ एकर जमीन खरेदी केलीहोती. येथे त्यांनी अमली पदार्थ बनवण्याचा कारखाना सुरू केला. शिंदे यानेतयार केलेले रसायन १ लाख रुपयांनी विक्री करण्यात येत होते. कारखान्यातजप्त करण्यात आलेला मेफेड्रोन हा क्रिस्टल स्वरूपात होता, त्याला लॅव्हिशअसेही म्हणतात.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .